तरूण भारत

# अधिविभाग, महाविद्यालये सुरु करा

- विद्यापीठ प्रशासनावर पुन्हा परिपत्रक काढण्याची वेळ
- पदवी अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षा
- इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, एमबीए यासह पदव्युत्तरचे ऑफलाईन शिक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व अधिविभाग व महाविद्यालये मंगळवारपासून सुरू झाली आहेत. इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए, लॉ. पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाल्याने या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण झाला नाही. त्यामुळे हे वर्ग ऑफलाईन सुरू झाले. परंतू विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयीन प्राध्यापकांमध्ये गैरसमज निर्माण झाला. यामुळे विद्यापीठ प्रशासनाने मंगळवारी पुन्हा एकदा परिपत्रक काढून महाविद्यालये व अधिविभाग सुरू करा, अशा सूचना दिल्या, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

शिक्षणमंत्र्यांच्या सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठातील सर्व महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून सुरू होणे गरजेचे आहे. परंतू आमचे सत्र संपले असून सुट्ट्या लागल्या आहेत, म्हणून काही महाविद्यालये सुरूच केली नाहीत. ऑनलाईन परीक्षा सुरू असल्या तरी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पाहिजे असेल तर प्राध्यापक कॉलेजमध्ये असणार की नाही, असा सवाल विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. याचाच अर्थ राज्यभरातील विद्यापीठांना एक आणि शिवाजी विद्यापीठाला एक नियम आहे का? अशी चर्चा आहे. असे असले तरी इंजिनिअरिंग, फार्मसी, एम. बी. ए. लॉचे वर्ग सुरू झाले आहेत. तरी विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालये सुरू करावीत, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने परिपत्रकाद्वारे मंगळवारी दिल्या. यात शासन नियमानुसार महाविद्यालये ऑफलाईन सुरू करणे आवश्यक असून अधिविभाग व महाविद्यालये सुरू करा, असे परिपत्रक पुन्हा काढण्याची वेळ आली आहे.

लोकमत

# महाविद्यालयांतील वर्ग सुरू करावेत

कोल्हापूर : जिल्ह्यातील विद्यापीठ आणि त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, तंत्रनिकेतन, शैक्षणिक संस्थांमधील नियमित वर्ग गुरुवार (दि. ३) पासून प्रत्यक्षरीत्या ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यास जिल्हा प्रशासनाने मंगळवारी परवानगी दिली. दोन्ही लसीकरण पूर्ण झालेल्या आंणि कोरोनाची लक्षणे नाहीत अशा शिक्षक, कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयात उपस्थित रहावे. शिक्षकांचा एकत्रित वापर करून अध्यापन करणे, दोन सत्रात वर्ग भरविणे, महाविद्यालय ऑनलाईन सुरू ठेवणे किंवा किमान ५० टक्के विद्यार्थी ऑनलाईन असतील याची खात्री करून महाविद्यालय ऑनलाईन तसेच ऑफलाईन सुरू ठेवणे यापैकी पर्याय निवडावा, आदी सूचना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केल्या आहेत.

लोकमत

# पदवी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या सूचनेनुसार कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांनी पदवी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षा मंगळवारपासून सुरू केल्या. त्यात विज्ञान विद्याशाखा असलेल्या महाविद्यालयांचा अधिक समावेश आहे. शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र संपून सुटी सुरू झाल्याने विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील ऑफलाईन वर्ग दि. २ मार्चपासून भरणार आहेत. कोरोना, ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा दि. १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन घेण्याची सूचना परीक्षा मंडळाने महाविद्यालयांना गेल्या महिन्यात दिली. त्यानुसार कार्यवाही करत महाविद्यालयांनी मंगळवारपासून ऑनलाईन परीक्षांची सुरुवात केली. सकाळी साडेआठ ते साडेनऊ, दहा ते अकरा, दुपारी एक ते दोन, दुपारी तीन ते सायंकाळी पाच अशा विविध चार सत्रांमध्ये परीक्षांचे नियोजन महाविद्यालयांनी केले आहे. परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालयांनी संगणक क्षेत्राशी संबंधित संस्थांची निवड केली आहे. कला, वाणिज्य विद्याशाखा असलेल्या काही महाविद्यालयांनी शुक्रवारपासून परीक्षा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुढारी

# सोशल मीडियामुळे स्वतंत्र विचाराची क्षमता हरवली

## प्रा. बोराटे; डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बिग डेटा, नोटिफिकेशन व अल्गोरिदमच्या साहाय्याने सोशल मीडिया मानवी जगण्यात हस्तक्षेप करत आहे. ट्रेंड व सजेशनवर तयार होणारी मते धोकादायक आहेत. सोशल मीडियाच्या प्रभावाखाली माणसांची स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हरवली आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रा. योगेश बोराटे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व तिटवे (ता. राधानगरी) येथील शहीद



वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सोशल मीडियाची आजादी : किती खरी, किती खोटी?' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. 'आजादी का अमृत महोत्सव' उपक्रमांतर्गत व्याख्यान झाले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. दिग्विजय कुंभार यांनी आभार मानले.

02 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधीजींच्या विचारांनी स्वत:सह समाजाला सुखी बनवा

## डॉ. व्ही. एन. शिंदे : न्यू कॉलेजमध्ये गोलमेज परिषद उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा गांधीजींचे विचार हे कालातीत असून, प्रत्येक काळात त्याची उपयुक्तता वाढत असल्याचे दिसून येते. त्यांच्या विचारांच्या साहाय्याने मानवी पर्यावरण सुरक्षितता, जगा आणि जगू द्या, या तत्त्वांची अंमलबजावणी करणे आपणास शक्य होते. या विचारांच्या माध्यमातून आपण स्वतःला आणि समाजाला सुखी बनवू शकतो, असे प्रतिपादन गोलमेज परिषदेचे प्रमुख मार्गदर्शक शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेज येथे महात्मा गांधी पुण्यातिथीनिमित्त आयोजित गोलमेज परिषदेमध्ये 'महात्मा गांधीजींच्या विचारांची समकालीन उपयुक्तता' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, या विश्वातील हवा, पाणी आणि अन्न वारसा म्हणून मिळालेल्या नाहीत. त्या आहे त्या पद्धतीने पुढच्या पिढीसाठी हस्तांतरित करणे विश्वस्त म्हणून आपली जबाबदारी आहे.



कोल्हापूर : गोलमेज परिषदेमध्ये बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत अन्य मान्यवर.

डॉ. दत्ता जाधव म्हणाले, शालेय जीवनापासून गांधी साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश करायला हवा. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठडीया म्हणाले, सोशल मीडियाद्वारे महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रसार करण्याची संधी आहे. चुकीचा प्रचार माध्यमातून केला जातो. त्याचा प्रतिवाद त्याच माध्यमाद्वारे करायला हवा.

यावेळी ॲड. सावंत, सामाजिक कार्यकर्त्या भारती पवार, शेतीतज्ज्ञ मिलिंद पाटील, प्रा. रोहन चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.

महात्मा गांधी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. स्वागत, प्रास्ताविक मोहनदास करमचंद गांधी विचार मंचचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर यांनी केले.

परिषदेमध्ये डॉ. लखन भोगम, ॲड. श्रीकांत साळोखे, धीरेंद्र वार्ड, सूरज पुरी, सुभाष सुधा, डॉ. ए. ए. कलगोंडा, रोहित थोरात, अभिषेक मिठारी, यश आंबोळे, रोमालीन गोदाद, प्रभाकर पाटील, प्रा. आर. एस. किरूळकर यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन ऋतुजा पाटील हिने केले. आभार प्रभाकर पाटील यांनी मानले.

**परिषदेतील ठराव**

- अभ्यासक्रमात महात्मा गांधींच्या विचारांवर पाठाचा समावेश करावा
- छोट्या पुस्तिकेच्या माध्यमातून महात्मा गांधीजींचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावेत
- सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विचारांवर आधारित पुरोगामी विचारांचे मेळावे, परिषद सातत्याने भरवाव्यात

02 FEB 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियामुळे स्वतंत्र विचाराची क्षमता हरवली

## प्रा. योगेश बोराटे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बिग डेटा, नोटिफिकेशन आणि अल्गोरिदमच्या साहाय्याने सोशल मीडिया मानवी जगण्यात हस्तक्षेप करत आहे. ट्रेंड आणि सजेशनवर तयार होणारी मते धोकादायक आहेत. सोशल मीडियाच्या प्रभावाखाली माणसांची स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हरवली आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रा. योगेश बोराटे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि तिटवे (ता. राधानगरी) येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सोशल मीडियाची आजादी : किती खरी, किती खोटी?' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले.

प्रा. योगेश बोराटे म्हणाले, सोशल मीडिया हाताळताना भारतीय राज्यघटनेतील समता, न्याय आणि बंधुता या तत्त्वांचा विसर पडता कामा नये. सोशल मीडियातून रंजक जगाचा आभास तयार केला जातो. त्यामुळे लोक या मीडियात गुंतून राहतात. यामध्ये ते आपला अमूल्य वेळ वाया घालवतात. लोकांच्या वेळेच्या गुंतवणुकीवरच सोशल मीडियाचे अर्थकारण अवलंबून आहे. एका अर्थाने सोशल मीडिया भावनांची ऑनलाईन बाजारपेठ व आकड्यांचा खेळ आहे.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. बी. ए. पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. दिग्विजय कुंभार यांनी आभार मानले.